नि. फौ. ख. क्र.७३/२०२२ **निशाणी क्र.४०**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

नाव – रमेश गुलाब चव्हाण,

वय – ४० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. परडी, ता. वडवणी, जि. बीड.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.३.१५ वा. सुरुः**

**१.** दि.२७.०९.२०२२ रोजी मी परडी गावात हजर होतो. त्या दिवशी पोलीस कर्मचारी वाघमारे साहेब परडी गावात आले होते. श्री वाघमारे यांनी मला घटनास्थळी म्हणजे लक्ष्मण शेंद्रे यांच्या घरी पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. घटनास्थळ आम्हाला लक्ष्मण शेंद्रे यांनी दाखविले होते.

**२.** पोलीस कर्मचारी श्री वाघमारे यांनी माझ्या समक्ष घटनास्थळाची बारकाईने पाहणी करुन घटनास्थळ पंचनामा तयार केला, सदर पंचनामा मला वाचुन दाखविला होता, त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केली आहे. आता मला दि.२७.०९.२०२२ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. ०२ वर माझी सही असुन तो पंचनामा माझ्या हजेरीत तयार करण्यात आलेला आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. टी. ए. शेख यांच्यामार्फत**

**३.** हे म्हणणे खरे आहे की,श्री वाघमारे हे आमच्या गावाचे बीट अंमलदार होते. हे म्हणणे खरे नाही की, ते बीट जमादार असल्यामुळे त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी रुपला चव्हाण हे आमच्या भावकीतील आहे. हे मला माहिती नाही की, शिवाजी रुपला चव्हाण आणि आरोपी यांच्या मध्ये शेती आणि रस्त्याच्या कारणावरुन वाद आहेत किंवा नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, परडी गावापासून परडी तांडा ब–याच अंतरावर आहे. स्वतःहुन सांगतो की, १००–१५० मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी लक्ष्मण विक्रम शेंद्रे यांच्या सोबत माझे चांगले संबंध आहेत. दि.२७.०९.२०२२ रोजी मी गावातच होतो. श्री वाघमारे गावात आल्यावर माझ्याकडे आले नव्हते.

४.  घटनास्थळावर पंचनामा करतेवेळी पाच ते सात लोक जमा झाले होते. मी दि.२७.०९.२०२२ रोजी पंचनाम्यावर दु.१२.०० ते दु.३.०० या वेळे दरम्यान सही केलेली आहे, परंतु सही केल्याची निश्चीत वेळ मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वाघमारे यांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली आहे. स्वतःहुन सांगतो की, मी पंचनामा वाचून त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा मी स्वतः वाचलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस चौकीमध्ये सही केलेली असून, मी घटनास्थळावर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या पंचाने माझ्या समक्ष पंचनाम्यावर सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा मित्र असल्यामुळे मी खोटा पंच झालो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या वेळी कथन केलेल्या सर्व बाबी खोटया सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी लक्ष्मण विक्रम शेंद्रे यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दु.३.३० वा. पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०४/०२/२०२६**

**समक्ष**

sd/–

**(विष्णु द. गिते)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
वडवणी, जि. बीड.

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

sd/–

**(विष्णु द. गिते)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
वडवणी, जि. बीड.